Spare copy

**तातडीचे :-**

क्र.पोमसं/२८-ओ/४९३७/वा.शै.अनुदान/वर्ग-ड ते वश्रेलि/९२/२०१७ मुंबई, दि.27/10/२०१७.

संदर्भ :- **या कार्यालयाचे समक्रमांक दि.१८.०५.२०१७ चे परिपत्रक.**

विषय :- **पोलीस कर्मचा-यांच्या (वरिष्ठ श्रेणी लिपीक ते कनिष्ठ श्रेणी लिपीक तसेच वर्ग-ड चे कर्मचारी. ) मुलींना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून माध्यमिक ते उच्चमाध्यमिक ( इ ५ वी ते १० वी ) पर्यंतच्या शिक्षणासाठी वार्षिक शैक्षणिक अनुदान मंजूर करण्याबाबत.**

* * * * * *

संदर्भाधीन परिपत्रकाच्या अनुषंगाने पोलीस कल्याण निधी नियमावली मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीतंर्गत पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक (ASI) या दर्जाच्या पोलीस कर्मचा-यांच्या मुलींना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून माध्यमिक ते उच्चमाध्यमिक ( इ ५ वी ते १० वी ) पर्यतच्या शिक्षणासाठी वार्षिक शैक्षणिक अनुदान त्यांना घटक पोलीस कल्याण निधीतून प्रत्येकी रु.५००/- (अक्षरी रक्कम रुपये :- पाचशे फक्त) एकरकमी अनुदान म्हणुन देण्याबाबत घटक कार्यालयांनी कार्यवाही चालु केलेली आहे.

त्याअनुषंगाने सर्व पोलीस घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, वर्ग-ड तसेच कनिष्ठ श्रेणी लिपीक ते वरिष्ठ श्रेणी लिपीक (कमाल मर्यादा ग्रेड पे रु.२४००/- पर्यत ) चे कर्मचारी जे पोलीस कल्याण निधीचे सदस्य आहेत त्यांच्या २ मुलींना घटक पोलीस कल्याण निधीतून प्रत्येकी ५००/- रुपये वार्षिक इतके शैक्षणिक प्रोत्साहन अनुदान देण्यात यावे.

**या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, या कार्यालयाचे दि.१८.०५.२०१७ च्या परिपत्रकान्वये हे अनुदान मंजूर करताना कर्मचा-यांच्या मुली शिक्षण घेत असल्याबाबत शाळेच्या प्रमाणपत्राची अट निश्चित केली होती. सदरची अट ही रद्द करण्यात येत आहे. कर्मचा-यांनी शैक्षणिक अनुदानासाठी लेखी स्वाक्षरीत अर्ज केल्यावर तो लेखी स्वाक्षरीतला अर्ज हेच स्वसांक्षाकित प्रमाणपत्र समजून अर्जदारांना तात्काळ रक्कम मंजूर व अदा करावी. अर्जदारांकडे इतर कोणत्याही प्रकारच्या कागदपत्राची मागणी करु नये. तसेच सदरची रक्कम कर्मचा-यांच्या थेट बँक खात्यात जमा करावी.**

पोलीस कल्याण निधीचे कामकाज पाहणा-या लिपीकांने ज्या पोलीस कर्मचा-यांना तसेच मंत्रालयीन कर्मचा-यांना वार्षिक शैक्षणिक अनुदानाची रक्कम अदा करतील, त्याबाबतच्या आवश्यक त्या नोंदी ठेवून, अभिलेख अद्ययावत ठेवावे.

27/10/17

**( डॉ. प्रज्ञा सरवदे )**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

महासंचालक, अँटी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई (सस्नेह अग्रेषित)
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे / प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल / वाहतूक / लोहमार्ग / विशेष कृती / द.वि.प., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.

Desktop/Memo/2017

Scanned by CamScanner

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह) (बृहन्मंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, म.रा., मुंबई/ न.वि.अ.,नागपूर/ **फोर्स वन,मुंबई**
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, म.रा., पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सहीत)
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र.१ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालयें रा.रा.पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड सह
उप संचालक, डी.टी.एस्., नाशिक.
पोमसं कार्यालयातील विधी सल्लागार/विधी अधिकारी/वउपसहा.(नि.वे.)/आस्थापना-१
पोमसं कार्यालयातील स्वीय सहायक/लघुलेखक.
पोमसं कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी (का.क्र.१ ते ४४)
(त्यांनी उपरोक्त परिपत्रक सर्व लिपिकांच्या निदर्शनास आणून द्यावे.)

प्रत,

पोलीस आयुक्त बृहन्मंबई (सस्नेह)
प्रभारी अधिकारी, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, म.रा.यांचे कार्यालय, मुंबई.

२/- प्रभारी अधिका-यांनी सोबत जोडलेले परिपत्रक पोलीस विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

Scanned by CamScanner